**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**
(A Government of Maharashtra Undertaking)
**Dadasaheb Phalke Chitranagari**
Filmcity, Mumbai
https://filmcitymumbai.org

**चित्रपताका चित्रपट महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात!**

**सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी घेतला आढावा**

**२ हजार पेक्षा अधिक प्रेक्षकांची नोंदणी पूर्ण.**

मुंबई १८: पहिल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून आत्तापर्यंत दोन हजार प्रेक्षकांनी महोत्सवाकरिता नाव नोंदणी केली आहे . शनिवारी सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी पूर्वतयारीचा आढावा घेतला. यावेळी बैठकीला दादासाहेब फाळके चित्र नगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह व्यवस्थापकी संचालक प्रशांत साजणीकर, पु.लं देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर,मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार तथा मुख्य लेखा वित्त अधिकारी चित्रलेखा खातूराव राणे,विशेष समन्वय अधिकारी सुचित्रा देशपांडे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

२१ ते २४ एप्रिल दरम्यान पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे हा महोत्सव संपन्न होणार आहे. या महोत्सवामध्ये प्रेक्षकांना विविध ४१ आशयघन चित्रपट विनामूल्य पाहता येणार आहेत. त्याचबरोबर सिने रसिकांसाठी पाच परिसंवाद, एक मुलाखती आणि दोन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाची नाव नोंदणी ऑनलाईन पद्धतीने सुरू असून अधिकाधिक प्रेक्षकांनी या महोत्सवाला उपस्थिती लावावी असे आवाहन करण्यात येत आहे.

_____

चौकट

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पहिल्या मराठी चित्रपट महोत्सवासाठी आम्ही सज्ज आहोत,कार्यक्रमाची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात आली आहे. प्रेक्षकांना सकस मनोरंजन आणि वैचारिक परिसंवाद या महोत्सवामध्ये ऐकायला मिळतील तेंव्हा जास्तीत जास्त रसिकांनी या संधीचा आवाहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी केले आहे